| | |
|---|---|
| MHSN080021092020 | दाखल तारीख – ०७.१२.२०२०<br>नोंदणी तारीख – ०७.१२.२०२०<br>निकाल तारीख – १८.०७.२०२६<br>कालावधी – वर्षे – महिने–दिवस<br>०५ ०७ ११ |

**जत येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालय,**
**(पिठासीन अधिकारी प्रकाश चु. बछले)**

**नियमित फौजदारी खटला क्र.४२५/२०२०**
**निशाणी क्र.**

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्ष | | **महाराष्ट्र शासन तर्फे**<br>पोलीस ठाणे अधिकारी,<br>जत पोलीस ठाणे. |
| अभियोग पक्षातर्फे | | श्री. अ. व. विरकर<br>सहाय्यक सरकारी अभियोक्ता |
| | | |
| आरोपी | **१.** | **सुखदेव मनगा शिंगाडे,**<br>वय–४५ वर्षे, व्यवसाय – नोकरी, |
| | **२.** | **मनिषा बाबासो शिंगाडे,**<br>वय–३० वर्षे, व्यवसाय – घरकाम, |
| | **३.** | **धनाजी दत्ता शिंगाडे,**<br>वय–१८ वर्षे, व्यवसाय – शिक्षण,<br>सर्व रा. बेळुंखी, ता. जत, जि. सांगली. |
| आरोपीतर्फे वकील | | श्री. आय. एस. खतीब |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडलेचा दिनांक | – | ०४.०१.२०२० |
| गुन्हा रजिस्टर क्रमांक | – | ०८/२०२० |

| | | |
|---|---|---|
| फिर्याद दाखल दिनांक | – | ०४.०१.२०२० |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल दिनांक | – | ३०.०१.२०२० |
| दोषारोप ठेवलेचा दिनांक | – | ०९.०२.२०२४ |
| साक्षीपुरावा सुरु झालेचा दिनांक | – | ०५.१२.२०२५ |
| युक्तिवाद दिनांक | – | १७.०७.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | – | १७.०७.२०२६ |
| दोषसिध्दी व शिक्षेबाबत आदेश | – | ---- |

**<u>आरोपींची माहिती</u>**

| अ. क्र. | आरोपीचे नांव | आरोपीस अटक दिनांक | आरोपीस जामिनावर खुले केलेचा दिनांक | दोषारोपातील कलम | आरोपीस दोषमुक्त किंवा दोषसिध्द केले | आरोपीस झालेली शिक्षा | फौ.प्र. सं. कलम ४२८ नुसारआरोपीने संपरिक्षे दरम्यान भोगलेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सुखदेव मनगा शिंगाडे | ०७.०१. २०२० | ०७.०१. २०२० | भा.दं.वि.स. कलम ३५४, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्तता | --- | --- |
| २. | मनिषा बाबासो शिंगाडे | ०७.०१. २०२० | ०७.०१. २०२० | | निर्दोष मुक्तता | --- | --- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३. | धनाजी दत्ता शिंगाडे | ०७.०१. २०२० | ०७.०१. २०२० | | निर्दोष मुक्तता | --- | --- |

## अभियोग पक्षातर्फे घेतलेल्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | निशाणी क्रमांक | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | बसवराज चन्नाप्पा यलगार | २२ | मुद्देमाल जप्ती पंच |
| ०२. | लक्ष्मण गुंडा पुजारी | २४ | मुद्देमाल जप्ती पंच |
| ०३. | लता बाळकृष्ण शिंगाडे | २६ | फिर्यादी |
| ०४. | बाळकृष्ण शिवाजी शिंगाडे | २९ | साक्षीदार |
| ०५. | अशोक आप्पासो मोहिते | ३१ | वैदयकीय अधिकारी |
| ०६. | शंकर बाबुराव पवार | ३३ | तपासी अधिकारी |

## अभियोग पक्षातर्फे सिध्द केलेले दस्तऐवज

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| ०१. | २७ | वर्दीजबाब |
| ०२. | २८ | छापील पहिली खबर |
| ०३. | ३२ | फिर्यादी लता यांचे वैदयकीय प्रमाणपत्र |
| ०४. | ३४ | घटनास्थळ-मुद्देमाल जप्ती पंचनामा |
| ०५. | ८४ | तपास आदेश |

## <u>न्या य नि र्ण य</u>
## (घोषित दिनांक १८.०७.२०२६)

आरोपी क्र.१ ते ३ यांचे विरुध्द भारतीय दंड संहिता १८६० (येथून पुढे संक्षिप्तपणे भा.द.वि. असे संबोधण्यात येईल) चे कलम ३५४, ३२३, ३२४,५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचा दोषारोप आहे.

**<u>अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात पुढीलप्रमाणे</u> –**

२. घटनेच्या वेळी फिर्यादी लता बाळकृष्ण शिंगाडे या त्यांच्या कुटुंबासमवेत मौजे बेळुंखी, ता. जत येथे राहणेस होत्या. आरोपी क्र.१ ते ३ हे फिर्यादी यांच्या शेजारी राहणेस होते. फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये शेतीच्या कारणामुळे वाद सुरु आहेत. दिनांक ०४.०१.२०२० रोजी सायंकाळी ०५.०० वा. चे सुमारास फिर्यादी या त्यांच्या शेतामध्ये वैरण काढत होत्या. त्यावेळी आरोपी क्र.१ ते ३ तेथे आले. त्यांनी जुन्या भांडणाचा राग मनात धरुन चिडून फिर्यादी यांना वाईट शिवीगाळ करणेस सुरुवात केली. आरोपी क्र.१ सुखदेव शिंगाडे यांनी चिंचेच्या झाडाच्या ओल्या फोकाने फिर्यादी यांच्या दोन्ही हातावर, दोन्ही पायावर मारहाण केली. आरोपी क्र.२ मनिषा शिंगाडे यांनी सुबाभळीच्या काठीने फिर्यादी यांच्या अंगावर मारुन जखमी केले. तसेच आरोपी क्र.३ धनाजी शिंगाडे यांनी फिर्यादी यांना पाठीमागून येवून कवळा मारुन गच्च पकडून फिर्यादी यांचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले. तसेच आरोपींनी फिर्यादी यांना "तु येथे कशी राहतेस, तुला जिवंत ठेवत नाही" अशी धमकी दिली. त्यावेळी फिर्यादी यांचे पती बाळकृष्ण शिवाजी शिंगाडे यांनी भांडणे सोडविली. फिर्यादी या त्यांच्या पतीसोबत तक्रार देणेकरिता जत पोलीस ठाणे येथे गेल्या. पोलीसांनी त्यांना मेडीकल यादी देवून ग्रामीण रुग्णालय, जत येथे औषधोपचाराकरिता पाठविले. औषधोपचार घेतल्यानंतर फिर्यादी यांनी आरोपी विरुध्द सदरची तक्रार दाखल केली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन

आरोपी विरुद्ध भा.द.वि.कलम ३५४, ३२३, ३२४,५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा नोंद करणेत आला.

३. सदर गुन्हयाचा तपास श्री. एस. बी. पवार स.पो.फौ., जत पोलीस ठाणे यांनी केला. त्यांनी आरोपींना अटक केली. साक्षीदारांचे जबाब नोंदविले. घटनास्थळ– मुद्देमाल जप्ती पंचनामा करुन मुद्देमाल जप्त केला. वैदयकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. चौकशीअंती आरोपींनी गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपी विरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. निशाणी क्र.१६ कडे भा.द.वि.कलम ३५४, ३२३, ३२४,५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये आरोपींवर दोषारोप ठेवणेत आला. आरोपींनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगून खटला पुढे चालविण्याची संमत्ती दर्शविली. गुन्हयामध्ये गोवविण्याइतपत पुरावा आल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये निवेदन अनुक्रमे नि.३६ ते ३८ कडे नोंदविण्यात आले. आरोपीतर्फे घेणेत आलेला बचाव हा पुर्णपणे नकारार्थी स्वरुपाचा आहे.

४. प्रस्तुत प्रकरणातील सारांश तसेच अभिलेखावर दाखल पुरावा व कागदपत्रे तसेच दोन्ही वकीलांचा युक्तीवाद यांचा विचार करता खालील मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दयावरील निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे दिले आहेत–

| **अ.क्र** | **विचाराधीन बाब** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | दिनांक ०४.०१.२०२० रोजी सायंकाळी ०५.०० वा. चे सुमारास मौजे बेळुंखी, ता. जत येथील फिर्यादी यांच्या शेतात आरोपी क्र.१ ते ३ यांनी आपसात संगनमत करुन आरोपी क्र.३ यांनी फिर्यादी लता यांना पाठीमागून मिठी मारुन त्यांचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले म्हणून त्यांनी भा.द.वि.कलम **३५४** सह कलम **३४** अन्वये गुन्हा केला ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली आहे काय? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| **२.** | वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादी यांना ओल्या चिंचेच्या फोकाने व सुबाभळीच्या काठीने मारहाण करून ऐच्छीक दुखापत पोहोचवली आणि त्यायोगे भा.द.वि. कलम **३२४ सह कलम ३४** अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | नाही. |
| **३.** | वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादी यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली आणि त्यायोगे भा.द.वि. कलम **३२३** सह कलम **३४** अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | नाही. |
| **४.** | वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादी यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून त्यांचा अपमान करून त्या सार्वजनिक शांततेचा भंग करतील असे प्रक्षोभन दिले आणि त्यायोगे भा.द.वि. कलम **५०४** सह कलम **३४** अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | नाही. |
| **५.** | वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादी यांना दमदाटी करून भा.द.वि.सं. कलम **५०६** सह कलम **३४** अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | नाही. |
| **६.** | आदेश काय? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## <u>कारणमिमांसा</u>

**५.** भा.दं.सं.कलम ३५४, ३२४, ५०४, ५०६ अन्वये आरोपींवर दोषसिध्दी होण्याकरिता अभियोग पक्षास हे सिध्द करावे लागेल की, दिनांक ०४.०१.२०२० रोजी सायंकाळी ०५.०० वा. चे सुमारास फिर्यादी यांच्या शेतात मौजे बेळुंखी, ता. जत येथे

आरोपींनी संगनमत करुन फिर्यादी यांना चिंचेच्या ओल्या फोकाने व सुबाभळीच्या काठीने मारहाण करून ऐच्छीक दुखापत पोहोचवली आणि फिर्यादी व साक्षीदार यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ व दमदाटी करून तिचा अपमान करून ते सार्वजनिक शांततेचा भंग करतील असे प्रक्षोभन दिले तसेच फिर्यादी यांच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. आरोपी विरुध्दचा खटला सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने बसवराज चन्नाप्पा यलगार (मुद्देमाल जप्ती पंच), लक्ष्मण गुंडा पुजारी (मुद्देमाल जप्ती पंच), लता बाळकृष्ण शिंगाडे (फिर्यादी), बाळकृष्ण शिवाजी शिंगाडे (साक्षीदार), अशोक आप्पासो मोहिते (वैदयकीय अधिकारी) व शंकर बाबुराव पवार (तपासी अधिकारी) असे एकूण ६ साक्षीदार तपासलेले आहेत.

**<u>विचाराधीन बाब क्र.१ बाबत</u>**ः–

६. सा.क्र.१ बसवराज यलगार (मुद्देमाल जप्ती पंच) यांनी शपथेवर असे कथन केले की, दिनांक ०५.०१.२०२० रोजी त्यांना कोणीही बोलावले नव्हते. पोलीस ठाणे समोरुन जात असताना त्यांना एक ओळखीचा पोलीस भेटला व त्यांनी सही करण्यास सांगितल्यामुळे त्यांनी सही केली. त्यांच्या समक्ष कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. जप्ती पंचनाम्यावर त्यांची सही असून त्यातील मजकूर त्यांना माहीत नाही. त्यामुळे, सदर साक्षीदाराला अभियोग पक्षातर्फे फितूर घोषीत करुन त्याचा विस्तृत उलटतपास घेतला. परंतु, अभियोग पक्षास मदत होईल असा कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

७. पुढे अभियोग पक्षातर्फे सा.क्र.२ लक्ष्मण गुंडा पुजारी(मुद्देमाल जप्ती पंच) यांना नि. २४ कडे तपासलेले आहे. सदर साक्षीदाराने सा.क्र.१ बसवराज यांच्याप्रमाणेच साक्ष दिली आहे. त्यांनी शपथेवर असे कथन केले आहे की, दिनांक ०५.०१.२०२० रोजी त्यांना कोणीही, कोठेही बोलावले नव्हते. त्यांच्या समक्ष कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. जप्ती पंचनाम्यावर त्यांची सही असून त्यातील मजकूर त्यांना

माहीत नाही. त्यामुळे, सदर साक्षीदाराला अभियोग पक्षातर्फे फितूर घोषीत करुन त्याचा देखील विस्तृत उलटतपास घेतला. परंतु, कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर येण्यास मदत झालेली नाही. त्यामुळे, आरोपीतर्फे विधीज्ञांनी सदर साक्षीदाराचा उलटतपास घेण्याचे नाकारले.

८. अभियोग पक्षाने पुढे फिर्यादी सा.क्र.३ जे घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत त्यांना नि.२६ कडे तपासलेले आहे. त्यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान असे कथन केले की, आरोपी क्र.१ हा त्यांचा चुलत दिर असून, आरोपी क्र.२ ही चुलत जाउ तर आरोपी क्र.३ हा त्यांच्या दीराचा मुलगा आहे. दिनांक ०४.०१.२०२० रोजी त्या बेळुंखी येथील त्यांच्या रानात होत्या. घटना ही संध्याकाळी ०५.०० वा. घडली होती. त्यावेळी त्या वैरण काढत होत्या. आरोपी क्र.१ तेथे आले व त्यांनी फिर्यादी यांना "बोडकी, उंडगी, आईचा दाणा, आईला महार लावतो, मांग लावतो" अशी शिवीगाळ करुन "पोलीस स्टेशनचे गेट पाहू देत नाही" अशी धमकी दिली. आरोपी क्र.१ यांनी सुबाभळीच्या काठीने त्यांच्या दोन्ही हातावर, पाठीवर व कमरेवर मारहाण केली. आरोपी क्र.३ धनाजी यांनी त्यांना मागून येवून धरले. आरोपी क्र.२ यांनी त्यांना चिंचेच्या काठीने मारले. नंतर त्यांच्या पतीने येवून भांडण सोडविले. त्यानंतर फिर्यादी या त्यांच्या पतीसोबत पोलीस ठाणेत गेल्या. पोलीसांनी त्यांना दवाखान्यात पाठविले. दवाखान्यातून आल्यानंतर फिर्यादी यांनी आरोपी विरुध्द फिर्याद दिली. सदर फिर्याद व छापील पहिली खबर मधील मजकूर व सही फिर्यादीने शपथेवर ओळखल्याने त्यांना अनुक्रमे नि.२७ व २८ देण्यात आली. ज्या काठयांनी त्यांना मारहाण करणेत आली होती त्या आर्टिकल 'अ' वरील काठया फिर्यादी यांनी न्यायालयात ओळखल्या.

९. आरोपीतर्फे घेणेत आलेल्या उलटतपासामध्ये, त्यांच्या व आरोपींच्या मध्ये शेत मिळकती व बांधाबाबत वाद आहेत याबाबतचा सुचनात्मक प्रश्न त्यांनी नाकारलेला आहे. परंतु, त्याचवेळेस आरोपी व त्यांच्यामधील शेताबाबतची तक्रार

पंचायतमध्ये गेली असल्याची बाब मान्य केलेली आहे. सदरची घटना शिंगाडे वस्तीतील असून तेथे लोकांची २० घरे आहेत तसेच शिंगाडे वस्तीला रस्ता असल्यामुळे तेथे रहदारी असते या बाबी मान्य केलेल्या आहेत. तसेच घटनास्थळी त्यांच्याव्यतिरिक्त इतर लोक देखील उपस्थित असल्याचे कबूल केलेले आहे. घटनेच्या वेळी झालेल्या घटनेतून त्यांना रक्त आले होते, घटनेच्या वेळी त्यांनी साडी नेसली होती व साडीस रक्त लागले असल्याचे मान्य केलेले आहे. घटनेच्या वेळेस फिर्यादी उत्तर दिशेला तोंड करुन उभी असल्याचे व त्यांच्या पाठीमागे सुखदेव उभा असल्याचे कथन केलेले आहे. फिर्यादी यांनी ही बाब स्पष्टपणे मान्य केली आहे की, गावातील पंचासोबत चर्चा करुन त्या फिर्याद देण्यासाठी गेल्या होत्या. घटना घडल्यानंतर त्या घरी गेल्या व त्यांच्या पतीस घटनेबाबत सांगितले होते हे फिर्यादी यांनी कबूल केलेले आहे. घटनेच्या दुसऱ्या दिवशी पोलीस घरी आल्यानंतर त्यांच्या पतीने पोलिसांना सर्व माहिती दिली हे मान्य केलेले आहे.

**१०.** अभियोग पक्षातर्फे सा.क्र.४ बाळकृष्ण जे फिर्यादी यांचे पती आहेत त्यांना तपासणेत आलेले आहे. त्यांनी पुराव्यादरम्यान असे कथन केले की, घटना शनिवारी घडली असून त्यावेळी ते जत येथे हमाली करत होते. त्यांच्या घरातून त्यांच्या पत्नीचा फोन आला व त्यांनी सांगितले की, " सुखदेव शिंगाडे यांनी रस्त्यातून गाडी इकडे तिकडे फिरवून शिवीगाळ केली". सदरचा फोन दुपारी ०३.०० च्या दरम्यान आला होता. त्यामुळे, त्यांनी दुसऱ्या दिवशी फिर्याद दिली. ते जत येथून घरी आले व तेथेच थांबले आणि त्यांची पत्नी शेतातून वैरण आणणेकरिता गेली होती. फिर्याद देवून आल्यावर त्यांचा मुलगा यशवंत याने मम्मीला मारायला लागले आहेत म्हणून तो त्यांच्याकडे पळत आला. ते घरातून घटनास्थळी गेले तेंव्हा सुखदेव शिंगाडे त्यांच्या पत्नीला मारत होता. सुखदेव शिंगाडे यांच्या हातात चिंचेची काठी होती आणि मनिषाच्या हातात सुबाभळीची काठी होती. त्यांच्या पत्नीच्या उजव्या हाताच्या बाजुवर, पाठीवर व कमरेवर सुखदेव याने मारहाण केली. मनिषाने त्यांच्या पत्नीला धरले होते. सदर साक्षीदाराने आर्टिकल 'अ' वरील काठया ओळखल्या.

**११.** आरापीतर्फे घेणेत आलेल्या उलटतपासामध्ये सदर साक्षीदाराने घटना ही शिंगाडे वस्तीवरील असून तेथे २० घरे आहेत, तेथे लोकांची रहदारी असते या बाबी कबूल केलेल्या आहेत. त्यांनी हे देखील स्पष्टपणे मान्य केलेले आहे की, संपूर्ण घटना घडली तेंव्हा ते घरीच होते व गावातील लोकांनी घटनेबद्दल त्यांना घरी येवून माहिति दिली. त्यांनी पुढे असे स्पष्ट मान्य केले आहे की, त्यांनी घटना प्रत्यक्ष पाहिलेली नाही.

**१२.** फिर्यादी सा.क्र.३ चे सा.क्र.४ पती असून अभियोग पक्षाच्या खटल्यानुसार सा.क्र.३ व ४ हे घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत. सा.क्र.३ ने घटनेच्या वेळेस आरोपींनी तिला मारहाण करुन आरोपी क्र.३ ने मागून मिठी मारुन तिचा विनयभंग केल्याचे साक्षीत सांगितले आहे. अभियोग पक्षाचा खटला देखील असाच आहे. परंतु, उलटतपासादरम्यान साक्षीदार क्र.३ ने तिला आरोपी सुखदेव हा तिच्या पाठीमागे उभा होता असे मान्य केले आहे. तसेच सा.क्र.४ ने सा.क्र.३ यांना घटनेच्या वेळी आरोपी क्र.२ मनिषा यांनी पाठीमागून धरले होते. सा.क्र.३ व ४ यांच्या साक्षीमध्ये घटनेच्या वेळी सा.क्र.३ यांना मिठी मारुन तिचा विनयभंग निश्चित कोणत्या आरोपीने केला या संबंधाने मोठी विसंगती आहे. तसेच सा.क्र.४ हा फिर्यादीचा पती असून सुध्दा त्याने साक्षीत मान्य केले आहे की, तो घटनेच्या वेळी घरी होता. आरोपी व फिर्यादीच्या कुटुंबामध्ये वाद असल्याचे तपासी अधिकारी यांनी साक्षीत कथन केलेले आहे व त्यावरुन घटना घडल्याचे सांगितले आहे. सा.क्र.३ व ४ हे घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असून त्यांच्या साक्षीमध्ये मोठी विसंगती असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे, सा.क्र.३ व ४ यांच्या साक्षी संबंधाने इतर साक्षीदारांची साक्ष विचारात घेणे गरजेचे आहे.

**१३.** पुढे अभियोग पक्षातर्फे सा.क्र.५ डॉ. अशोक आप्पासो माहिते यांना तपासणेत आलेले आहे. त्यांच्या सरतपासातील कथनानुसार, दिनांक ०४.०१.२०२० रोजी ते प्राथमिक आरोग्य केंद्र, जत येथे वैदयकीय अधिकारी म्हणून कार्यरत होते. जत येथील पोलीसांनी दिलेल्या वैदयकीय यादीनुसार लता बाळकृष्ण शिंगाडे या त्यांच्याकडे

आल्या होत्या. त्यांना तपासल्यानंतर खाली नमूद केल्याप्रमाणे त्यांना जखमा आढळून आल्या. 1. Contusion upper side of back, size 4x2 cm. 2. Contusion middle part of back, size 3x2 cm. 3. Contusion left hand dorsum, size 3x3 cm. 4. Contusion right arm, size 4x2 cm. सदर जखमा या साध्या स्वरुपाच्या व ६ तासांच्या आतील होत्या. त्यांनी पुढे असे कथन केले की, सदर जखमा या कठीण व बोथट वस्तुने होवू शकतात. तसेच सदर साक्षीदाराने वैदयकीय प्रमाणपत्रातील मजकूर व त्यावरील सही ओळखली, त्यामुळे त्यास नि.३२ देण्यात आली.

**१४.** आपल्या उलटतपासात साक्षीदाराने कबूल केले की, ज्या वस्तुने मारहाण केल्यामुळे जखमा झालेल्या आहेत त्या वस्तुचे वर्णन त्यांनी वैदयकीय प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेले नाही. नि.३२ कडील वैदयकीय प्रमाणपत्रामध्ये नमूद करणेत आलेल्या जखमा या काठीने मारहाण केल्यामुळे होवू शकतात याबाबत ते निश्चित सांगू शकत नसलेबाबतची बाब त्यांनी मान्य केलेली आहे. सा.क्र.५ यांच्या साक्षीवरुन असे स्पष्ट होते की, दिनांक ०४.०१.२०२० रोजी साक्षीदार क्र.३ यांना दवाखान्यात उपचाराकरिता आणल्यानंतर तिची तपासणी करणेत आली. त्या तपासणीमध्ये सा.क्र.३ यांना नि.३२ मधील वैदयकीय प्रमाणपत्रामध्ये नमूद करण्यात आल्याप्रमाणे दुखापती झाल्याचे त्यांना आढळून आले. परंतु, आरोपींनी मारहाण केल्यामुळे सा.क्र.३ यांना दुखापती झाल्या होत्या ही वस्तुस्थिती सा.क्र.५ च्या साक्षीवरुन स्पष्ट होत नाही.

**१५.** अभियोग पक्षातर्फे सा.क्र.६ शंकर बाबुराव पवार (तपासी अधिकारी) यांनी शपथेवर असे कथन केले की, ते कार्यरत असताना प्रस्तूत गुन्हयाचा तपास त्यांच्याकडे सोपविण्यात आला होता. त्यानुसार त्यांनी घटनास्थळी जावून दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला. गुन्हयात वापरणेत आलेल्या काठया घटनास्थळावरुन जप्त केल्या. त्यानंतर त्यांनी आरोपींना अटक केली व वैदयकीय

प्रमाणपत्र हस्तगत केले. साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तपासाअंती आरोपी विरुध्द पुरावा मिळून आल्याने त्यांच्या विरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. अशाप्रकारे प्रस्तुत साक्षीदाराने केलेल्या तपासाचे वर्णन त्यांच्या साक्षीतून केल्याचे दिसून येते.

**१६.** आपल्या उलटतपासामध्ये हे मान्य केले आहे की, जप्त करणेत आलेल्या काठयाप्रमाणे शेतात बऱ्याच प्रमाणात काठया मिळतात. पुर्वीच्या वादाच्या कारणावरुन घटना घडली असल्याचे त्यांनी कबूल केलेले आहे. घटनास्थळी आजुबाजूला लोक असतात ही बाब त्यांनी मान्य केली आहे. इतर सर्व सुचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तरे दिली आहेत.

**१७.** सर्व साक्षीदारांचा पुरावा व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर असे दिसून येते की, फिर्यादी यांच्या उलटतपासातील कथनानुसार, त्यांच्या पाठीमागे आरोपी क्र.१ सुखदेव उभा होता. त्याचवेळेस फिर्यादी यांनी त्यांच्या सरतपासामध्ये आरोपी क्र.३ धनाजी यांनी त्यांना मागून येवून धरले होते असे कथन केलेले आहे. तसेच फिर्यादी यांच्या दिनांक ०४.०१.२०२० रोजीच्या वर्दीजबाबानुसार आरोपी क्र.३ धनाजी दत्ता शिंगाडे यांनी त्यांना पाठीमागून येवून कवळा मारुन गच्च पकडले. तर सा.क्र.४ बाळकृष्ण यांच्या सरतपासातील कथनानुसार, मनिषाने त्यांच्या पत्नीला धरले होते. अशाप्रकारे सा.क्र.३ लता व सा.क्र.४ बाळकृष्ण यांच्या पुराव्यामध्ये विसंगती दिसून येते. अशाप्रकारे नेमक्या कोणत्या आरोपीने फिर्यादी यांना मिठी मारुन त्यांना लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले ही बाब सबळ पुराव्याद्वारे अभियोग पक्षास शाबीत करण्यात अपयश आलेले आहे. त्यामुळे, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.

**<u>विचाराधीन बाब क्र.२ व ३ बाबत</u>:–**

**१८.** अभियोग पक्षाच्या केसनुसार, आरोपी क्र.१ सुखदेव शिंगाडे यांनी चिंचेच्या झाडाच्या ओल्या फोकाने फिर्यादी यांच्या दोन्ही हातावर, दोन्ही पायावर मारहाण केली. आरोपी क्र.२ मनिषा शिंगाडे यांनी सुबाभळीच्या काठीने फिर्यादी यांच्या अंगावर मारुन जखमी केले. सा.क्र.३ फिर्यादी लता यांच्या कथनानुसार, आरोपी क्र.१ यांनी त्यांना सुबाभळीच्या काठीने त्यांच्या दोन्ही हातावर, पाठीवर व कमरेवर मारहाण केली. आरोपी क्र.२ यांनी त्यांना चिंचेच्या काठीने मारहाण केली. सा.क्र.४ बाळकृष्ण यांच्या कथनानुसार, सुखदेव शिंगाडे त्यांच्या पत्नीला मारत होता. सुखदेव शिंगाडे यांच्या हातात चिंचेची काठी होती आणि मनिषाच्या हातात सुबाभळीची काठी होती. त्यांच्या पत्नीला उजव्या हाताच्या बाजुवर, पाठीवर व कमरेवर सुखदेव याने मारहाण केली. तथापी, सा.क्र.४ बाळकृष्ण यांनी त्यांच्या उलटतपासात हे त्यांनी मान्य केले की, संपूर्ण घटना घडली तेंव्हा ते घरीच होते व गावातील लोकांनी घटनेबद्दल त्यांना घरी येवून माहिती दिली तसेच त्यांनी घटना प्रत्यक्ष पाहिलेली नाही. पती घटनास्थळी हजर होते असे फिर्यादी तिच्या सरतपासामध्ये अथवा उलटतपासामध्ये कोठेही कथन करत नाही. घटना घडल्यानंतर त्या घरी गेल्या व त्यांच्या पतीस घटनेबाबत सांगितले असे देखील फिर्यादी यांनी कबूल केलेले आहे. फिर्यादी म्हणते तशी खरोखरच घटना घडली असेल तर त्याबाबतची सर्व माहिती त्यांनी स्वतः पोलीसांना देणे अपेक्षित आहे. तथापी, फिर्यादी यांनी उलटतपासामध्ये दिलेल्या कबुलीनुसार त्यांच्या पतीने पोलीसांना घटनेबाबत माहिती दिली होती. त्याचबरोबर, सा.क्र.१ बसवराज व सा.क्र.२ लक्ष्मण हे दोघही मुद्देमाल जप्ती व घटनास्थळ पंचनाम्यावरील साक्षीदार असून त्यांनी अभियोग पक्षास कोणत्याही प्रकारे सहकार्य केलेले नाही आणि म्हणूनच घटनास्थळावरुन काठया जप्त करणेत आल्या होत्या ही बाब देखील शाबीत झालेली नाही. त्यामुळे, खरोखरच सा.क्र.३ लता व सा.क्र.४ बाळकृष्ण हे त्यांच्या सरतपासात कथन करतात त्याप्रमाणे घटना घडली होती याबाबत संशय निर्माण होतो.

**१९.** फिर्यादी यांच्या कबुली कथनानुसार, घटनास्थळ हा रहदारीचा रस्ता असून त्या ठिकाणी जवळपास २० लोकांची घरे आहेत तसेच घटनास्थळी फिर्यादी यांच्या व्यतिरिक्त इतर लोक देखील उपस्थित होते. सा.क्र.४ बाळकृष्ण यांची देखील उलटतपासातील कबुली कथने त्याच आशयाची आहेत. परंतु, अभियोग पक्षातर्फे प्रस्तूत कामी फिर्यादी व सा.क्र.४ म्हणजे फिर्यादीचे पती यांना तपासणेत आलेले आहे. घटनास्थळी इतर लोक हजर असताना देखील त्यांना या कामी तपासणेत आलेले नाही. परंतु, इतर स्वतंत्र साक्षीदार यांना कामी का तपासणेत आलेले नाही याबाबतचे स्पष्टीकरण अभियोग पक्षातर्फे देणेत आलेले नाही.

**२०.** तसेच घटनेच्या वेळी झालेल्या घटनेतून फिर्यादी यांना रक्त आले होते हे त्यांनी कबूल केलेले आहे. त्याचबरोबर घटनेच्या वेळी फिर्यादी यांनी साडी नेसली असून साडीस रक्त लागले असल्याचे देखील मान्य केलेले आहे. परंतु, तपासी अधिकारी यांनी प्रस्तूत कामी साडी जप्त केलेली नाही. तसेच साडी जप्त करणेस कोणती अडचण होती याबाबतचे कोणतेही स्पष्टीकरण अभियोग पक्षातर्फे सादर करण्यात आलेले नाही. त्याचप्रमाणे नि.३२ कडील वैदयकीय प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता त्यामध्ये नमूद करणेत आलेल्या जखमा या 'मुक्का मार' या स्वरुपाच्या दिसून येतात. रक्तवाहू स्वरूपाची जखमेची नोंद वैदयकीय प्रमाणपत्रामध्ये कोठेही नाही. सा.क्र.३ व ४ यांनी केलेल्या कथनांना वैदयकीय प्रमाणपत्र पुष्टी देत नाही. त्यामुळे, नि.क्र.३२ वरील वैदयकीय प्रमाणपत्रामध्ये नमूद करणेत आलेल्या दुखापती या आरोपींनी मारहाण केल्यामुळेच झाल्या या निष्कर्षापर्यंत निर्विवादपणे पोहोचता येणार नाही. त्याचबरोबर, घटनास्थळ कम जप्ती पंचनाम्याचे अवलोकन केले असता तो दिनांक ०५.०१.२०२० रोजीचा दिसून येतो. अभियोग पक्षाच्या कथनानुसार, घटना ही दिनांक ०४.०१.२०२० रोजी सायंकाळी ०५.०० वा. घडली होती. जप्ती पंचनाम्यातील मजकुरानुसार काठया या घटनास्थळावरुन दिनांक ०५.०१.२०२० रोजी जप्त करणेत आलेल्या आहेत. त्यामुळे, मारहाण करणेकरिता वापरणेत आलेल्या काठया दिनांक ०४.०१.२०२० पासून दिनांक

०५.०१.२०२० पर्यंत घटनास्थळीच पडून होत्या याबाबत देखील शंका निर्माण होते. त्यामुळे, फिर्यादी म्हणते तशी खरोखरच त्यांना मारहाण झाली होती यामध्ये तथ्य वाटत नाही.

**२१.** सा.क्र.१ व सा.क्र.२ यांनी अभियोग पक्षास सहाय्य केलेले नाही. सा.क्र.३ फिर्यादी ही घटनेची प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहे. तथापी, त्यांनी उलटतपासामध्ये दिलेल्या कबुली कथनांचा विचार करता, त्यांची साक्ष विश्वासार्ह वाटत नाही. सा.क्र.४ बाळकृष्ण यांच्या उलटतपासातील कबुली कथने विचारात घेता, सदर साक्षीदाराची साक्ष अभियोग पक्षास उपयोगी ठरत नाही. सा.क्र.५ डॉ. अशोक माहिते यांनी फिर्यादी यांना तपासून नि.३२ कडील वैदयकीय प्रमाणपत्र जारी केले असले तरी, वर नमूद केल्याप्रमाणे वैद्यकीय प्रमाणपत्रामध्ये नमूद करणेत आलेल्या दुखापती आरोपी यांनी मारहाण केल्यामुळेच फिर्यादी यांना झाल्या ही बाब शाबीत झालेली नाही. सा.क्र.६ तपासी अधिकारी हे औपचारिक स्वरुपाचे (formal nature) साक्षीदार आहेत. ते कोणतीही बाब स्वतः स्वतंत्रपणे सिध्द करु शकत नाहीत. सदर साक्षीदाराने त्यांच्या जबाबाद्वारे त्यांनी केलेल्या तपासाचे विस्तृत विवेचन केलेले आहे. त्यामुळे, त्यांची साक्ष अभियोग पक्षास या कामी मदतीची ठरु शकत नाही. वर चर्चिल्याप्रमाणे, आरोपींनी फिर्यादी यांना काठीच्या सहाय्याने मारहाण केली ही बाब संशयापलिकडे शाबीत झालेली नाही. त्यामुळे, संशयाचा फायदा आरोपींना देणे उचित ठरते. सबब, विचाराधीन बाब क्र.२ व ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>विचाराधीन बाब क्र.४ व ५ बाबत</u>:–**

**२२.** आरोपी विरुध्दचा गुन्हा सिध्द करणेकरिता, आरोपींनी फिर्यादी यांना दमदाटी करुन अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली व त्यांचा अपमान करून ते सार्वजनिक शांततेचा भंग करतील असे प्रक्षोभन दिले हे अभियोग पक्षाने शाबीत करणे गरजेचे आहे. फिर्यादी या त्यांच्या शेतामध्ये वैरण काढत असताना आरोपी क्र.१ तेथे आले व त्यांनी

फिर्यादी यांना "बोडकी, उंडगी, आईचा दाणा, आईला महार लावतो, मांग लावतो" अशी शिवीगाळ करुन "पोलीस स्टेशनचे गेट पाहू देत नाही" अशी धमकी दिली. तथापी, फिर्यादी यांनी त्यांच्या दिनांक ०४.०१.२०२० रोजीच्या वर्दीजबाबामध्ये तसेच प्रथम खबरी अहवालामध्ये देखील आरोपींनी त्यांना बोडकी, उंडगी, आईचा दाणा, आईला महार लावतो, मांग लावतो अशी शिवीगाळ करुन धमकी दिल्याचा मजकूर नमूद नाही. तसेच फिर्यादी यांच्या कथनांना इतर कोणत्याही साक्षीदाराने दुजोरा दिलेला नाही. तसेच घटनेच्या दिवशी निश्चित कोणत्या कारणावरुन घटना घडली याचे कारण सा.क्र.३ यांनी आरोपींसोबत असलेला वाद होता असे फिर्यादमध्ये नमूद केले आहे. उलटतपासादरम्यान सा.क्र.३ व ४ यांनी मान्य केले आहे की, तिन्ही आरोपी वेगवेगळया ठिकाणी राहतात. त्यामुळे, घटनेच्या दिवशी तिन्ही आरोपी घटनास्थळी हजर होते ही बाब संशयास्पद आहे. सा.क्र.३ व ४ यांच्या साक्षीमध्ये अंतर्गत विसंगती असल्यामुळे व आरोपी सोबत वाद असल्याने सा.क्र.३ व ४ यांनी आरोपी विरुध्द पुरावा देण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत, सा.क्र.३ व ४ ची साक्ष आरोपी विरुध्द गुन्हा सिध्द करणेइतपत पुरेशी व पर्याप्त नाही. त्यामुळे, आरोपींना संशयाचा फायदा देवून त्यांना सदर गुन्हयातून निर्दोष मुक्त करणे न्यायाचे दृष्टीने योग्य असल्याचे माझे मत आहे. सबब, विचाराधीन बाब क्र.४ व ५ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**विचाराधीन बाब क्र.६ बाबत**:–

**२३**. एकंदरीत वरील सर्व विवेचनावरुन असे दिसते की, आरोपींवर भा.द.वि.कलम ३५४, ३२३, ३२४,५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये निश्चित करण्यात आलेले दोषारोप हे अभियोग पक्ष यांना संशयापलीकडे शाबीत करण्यास अपयश आलेले आहे. त्यामुळे, संशयाचा फायदा आरोपींना दिला पाहिजे. तसेच जो काही पुरावा अभिलेखावर आलेला आहे तो आरोपींना दोषी धरण्याइतपत सबळ व पुरेसा

नाही. सदरची बाब विचारात घेता, आरोपी हे पुरेशा पुराव्या अभावी निर्दोष मुक्ततेस पात्र ठरतात. म्हणून,विचाराधीन बाब क्र.६ करिता खालीप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. आरोपी क्र.१ सुखदेव मनगा शिंगाडे, आरोपी क्र.२ मनिषा बाबासो शिंगाडे, आरोपी क्र.३ धनाजी दत्ता शिंगाडे यांची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) अन्वये, भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ३५४, ३२३, ३२४,५०४,५०६ या गुन्हयातून निर्दोष मुक्तता करणेत येते.

२. आरोपींचा जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

३. प्रस्तुत कामी जप्त करणेत आलेली एक सुबाभळीची व एक चिंचेची काठी मुल्यहिन असल्यामुळे त्या अपील कालावधीनंतर नाश करणेत याव्यात.

४. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ चे पूर्ततेसाठी प्रत्येकी रक्कम रुपये १०,०००/– चे बंधपत्र सादर करावे.

५. सदर न्यायनिर्णयाची एक प्रत जिल्हा दंडाधिकारी, सांगली यांना पाठविणेत यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयामध्ये पारित करणेत आला.)

PRAKASH CHUNNI BACHHALE

Digitally signed by PRAKASH CHUNNI BACHHALE
Date: 2026.07.18 17:33:04 +0530

दिनांक –१८.०७.२०२६ (प्रकाश चु. बछले)
जत. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, जत .

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Shri. R. B. Samalewale, |
| Court Name | : | Shri. Prakash C. Bachhale<br>C.J.J.D. and J.M.F.C., Jath. |
| Date | : | 18.07.2026 |
| Signed by P.O.on | : | 18.07.2026 |
| Uploaded on | : | 18.07.2026 |